| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ९४ वा | बुधवार, दिनांक ०१ जुलै २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# श्रीकांत शिंदे आणि ओमराजे निंबाळकरांच्या केंद्रीय मंत्रिपदाची जोरदार चर्चा

**मुंबई/प्रतिनिधी:** दुसऱ्यांदा ठाकरेंच्या शिवसेनेला खिंडार पाडून सहा खासदार फोडल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं दिल्लीमध्ये वजन वाढलं आहे. केंद्रीय मंत्रिमंडळ फेरविस्तारामध्ये शिवसेना शिंदे गटाला कॅबिनेट मंत्रीपदासह आणखी एक मंत्रीपद मिळेल अशी चर्चा रंगली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर (१ जुलै) एकनाथ शिंदे यांचा दिल्ली दौरा होणार असल्याची चर्चा आहे. केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारासंदर्भात यांचा हा दिल्ली दौरा असल्याचे बोलले जात आहे. खासदार श्रीकांत शिंदे आणि ओमराजे निंबाळकर यांनी हे केंद्रीय मंत्रीपदाची शपथ घेणार असल्याची चर्चा सुद्धा जोरात रंगली आहे. या सर्व पार्श्वभूमीवरच हा शिंदे यांचा दौरा होत असल्याची सूत्रांनी माहिती दिली आहे.

**किती मंत्र्यांची सुट्टी होऊ शकते?**

धर्मेंद्र प्रधान (केंद्रीय शिक्षण मंत्री): देशातील राष्ट्रीय प्रवेश परीक्षांच्या (NEET) कथित पेपर लीक वादामुळे धर्मेंद्र प्रधान यांच्यावर प्रचंड राजकीय दबाव आहे. त्यामुळे या फेरबदलात त्यांची मंत्रिमंडळातून सुट्टी होऊ शकते, असे मानले जात आहे.

हरदीप सिंह पुरी (पेट्रोलियम मंत्री): हरदीप सिंह पुरी यांनाही मंत्रिमंडळातून वगळले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पक्ष संघटना किंवा अन्य जबाबदारीसाठी त्यांच्या नावाचा विचार केला जाऊ शकतो.

याशिवाय, ज्या मंत्र्यांची कामगिरी समाधानकारक राहिलेली नाही किंवा ज्या राज्यांमध्ये आगामी काळात निवडणुका आहेत, तिथले समीकरण साधण्यासाठी काही कनिष्ठ मंत्र्यांनाही डच्चू दिला जाण्याची शक्यता आहे.

**किती नवीन चेहरे येऊ शकतात?**

शक्तिकांत दास (माजी गव्हर्नर, आरबीआय): रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर आणि पंतप्रधानांचे माजी



प्रधान सचिव शक्तिकांत दास यांच्या नावाची सर्वाधिक चर्चा आहे. त्यांना थेट मंत्रिमंडळात आणून अत्यंत महत्त्वाची जबाबदारी दिली जाऊ शकते.

श्रीकांत शिंदे (खासदार, शिंदे गट): महाराष्ट्रातून महायुतीचे समीकरण मजबूत करण्यासाठी आणि शिंदे गटाला योग्य प्रतिनिधित्व देण्यासाठी खासदार श्रीकांत शिंदे यांची केंद्रीय मंत्रिमंडळात एन्ट्री होण्याची दाट शक्यता आहे.

अरुण गोविल (खासदार, भाजप): 'रामायण' फेम आणि मेरठचे नवनिर्वाचित खासदार अरुण गोविल यांनाही मंत्रिमंडळात स्थान मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**किती मंत्र्यांचे प्रमोशन होऊ शकते?**

काही सध्याच्या मंत्र्यांनी आपल्या कामाची चमक दाखवली आहे, तसेच पक्षाच्या अंतर्गत गणितात त्यांचे स्थान मजबूत झाले आहे, अशा नेत्यांना प्रमोशन मिळू शकते

अनुराग ठाकूर: भाजपच्या काही वरिष्ठ नेत्यांना कॅबिनेट रँकमध्ये अधिक महत्त्वाचे स्थान दिले जाण्याची शक्यता असून, अनुराग ठाकूर यांच्यासारख्या नेत्यांना अधिक मोठ्या भूमिकेत आणले जाऊ शकते.

काही राज्यमंत्र्यांना त्यांच्या चांगल्या कामगिरीचे बक्षीस म्हणून स्वतंत्र प्रभार किंवा थेट कॅबिनेट मंत्री म्हणून बढती मिळण्याची शक्यता आहे.

# नायराचे पेट्रोल ५, डिझेल ३ ने स्वस्त

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:** भोपाळमध्ये १ देशातील सर्वात मोठी खासगी इंधन किरकोळ विक्रेता कंपनी नायरा एनर्जीने पेट्रोलच्या दरात प्रति लिटर ५ रुपये आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर ३ रुपयांची कपात केली आहे.

या कपातीनंतर आता भोपाळमध्ये पेट्रोलची किंमत ११९.७९ रुपये आणि डिझेलची किंमत १०२.५७ रुपये झाली आहे. नायराचे देशभरात ७ हजार पेट्रोल पंप, हिस्सा ७% इतर कंपन्यांच्या मालकीच्या १,००,००० हून अधिक पंपांच्या तुलनेत, नायरा एनर्जी देशभरात ७,००० हून अधिक पेट्रोल पंप चालवते; यामुळे बाजारात त्यांचा ७% हिस्सा आहे. नायराचे नवीन दर देशभरात लागू झाले आहेत. तथापि, विविध राज्यांमधील स्थानिक कर आणि मूल्यवर्धित कर (व्हॅट) दरांमधील फरकामुळे शहरांनुसार किरकोळ दरांमध्ये थोडाफार फरक असू शकतो.

**जागतिक बाजारात कच्चे तेल स्वस्त झाल्याने दिलासा**




आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर प्रति बॅरल ७३ डॉलरवर घसरले आहेत. अमेरिका – इराण युद्धामुळे ते १०० डॉलरच्या वर गेले होते. तणाव कमी झाल्यामुळे दर घटले आहेत. त्यामुळे कंपनीने हा दिलासा दिला आहे.

सरकारी कंपन्यांनी अद्याप दर कमी केले नाहीत एकीकडे जिथे नायरा एनर्जी या खासगी कंपनीने दर कमी केले आहेत. तिथेच सरकारी तेल कंपन्या इंडियन ऑइल कॉर्पोरेशन (IOC), भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (BPCL) आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (HPCL) यांनी किमतींमध्ये कोणताही बदल केलेला नाही.

# सचिन अहिर यांची बिनविरोध निवड

**मुंबई/प्रतिनिधी:** महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती पदासाठी आज (१ जुलै २०२६) दुपारी १ वाजता प्रत्यक्ष निवडणूक पार पडली. या निवडणुकीत महायुतीकडून शिवसेनेचे (शिंदे गट) सचिन अहिर, तर महाविकास आघाडीकडून शिवसेनेचे (ठाकरे गट) ज. मो. अभ्यंकर एकमेकांसमोर उभे होते. विधान परिषदेत निवडणुकीचे काम सुरू होण्यापूर्वी संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी उपसभापती पदाची निवड ही बिनविरोध होण्याचा प्रघात असल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणले. यावेळी त्यांनी विरोधी पक्षाला उमेदवारी अर्ज मागे घेण्याची विनंती केली. यानंतर शिवसेना उबाठाचे आमदार अनिल परब यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार ज.मो. अभ्यंकर यांचा उमेदवारी अर्ज मागे घेण्याबाबत जाहीर केले. अशाप्रकारे सचिन अहिर यांची विधान परिषदेच्या उपसभापती पदी बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी अभिनंदनपर भाषण केले.

# अहमदपूर येथील खून प्रकरणातील फरार असलेला नांदेड जिल्ह्यातून जेरबंद

**लातूर/प्रतिनिधी:** स्थानिक गुन्हे शाखेने वरिष्ठांचे मार्गदर्शनात उल्लेखनीय कामगिरी करत सुमारे वीस दिवसांपूर्वी अहमदपूर जवळील लांजी गावाच्या गायरान परिसरात घडलेल्या खून प्रकरणातील फरार आरोपीचा अथक पाठपुरावा करून त्यांस नांदेड जिल्ह्यातून जेरबंद केले असून पुढील तपासासाठी अहमदपूर पोलीसांच्या ताब्यात दिले आहे.

सदर गुन्हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा असल्याने आरोपीचा तात्काळ शोध घेऊन त्यास अटक करण्याच्या दृष्टीने पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी निर्देश दिले होते. त्यानुसार अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात पथक तयार करण्यात आले होते. पथकाने गोपनीय बातमीदार,तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपीच्या हालचालींवर सातत्याने लक्ष ठेवले. अथक प्रयत्न, प्रभावी नियोजन आणि काटेकोर पाठपुराव्यामुळे अहमदपूर पोलीस ठाणे गु.र.नं. ३९९/२०२६, कलम १०३(२) भारतीय न्याय संहिता मधील फरार आरोपी

१) बालाजी बाबू जाधव (वय ३९ वर्षे, रा. मुगाव तांडा, ता. नायगाव, जि. नांदेड).

हा नांदेड जिल्ह्यातील मुखेड जवळील सलगरा फाटा परिसरात येणार असल्याची




खात्रीशीर माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीची शहानिशा करून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी सापळा रचला. दरम्यान आरोपी तेथे येताच त्याला पोलिसांची चाहूल लागल्याने तो पळून जाण्याचा प्रयत्न करू लागला. मात्र पोलिसांनी त्याचा पाठलाग करून अत्यंत शिताफीने त्याला जेरबंद केले.

ताब्यात घेतल्यानंतर आरोपीकडे सखोल चौकशी करण्यात आली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. चौकशीदरम्यान त्याने सांगितले की, सुमारे वीस दिवसांपूर्वी तो व त्याचा सहकारी गोविंद फटाटे (रा. नावंदी, ता. उदगीर, जि. लातूर) हे अहमदपूर येथे दिवसभर मिस्त्रीचे काम करून संध्याकाळी मजुरीचे पैसे घेतल्यानंतर दारूचे सेवन करून लांजी गावाजवळील गायरान परिसरात जेवणासाठी थांबले होते. त्यावेळी कामाच्या कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. वाद विकोपाला गेल्यानंतर आरोपीने टॉवेलने मृताचे हात बांधून त्याच्या गळ्यातील गमछ्याने गळा आवळून त्याचा खून केल्याची कबुली दिली. त्यावरून नमूद आरोपीस पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी अहमदपूर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले असून या गुन्ह्याचा पुढील तपास अहमदपूर पोलीस करीत आहेत.

ही उल्लेखनीय कारवाई पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक राजेश घाडगे, पोलीस अमलदार तुराबखान पठाण, माधव बिलापट्टे, नवनाथ हासबे, रामलिंग शिंदे, राजेश कंचे, गणेश साठे, श्रीनिवास जांभळे, शैलेष सुडे अंजली गायकवाड, रामदास बाचीफळे यांनी पार पाडली.

## प्रभात किरणे

हातातल डबड सुटता सुटेना
खाताना,पिताना,झोपताना
अति ओढ अति लागला नाद
खुंटली नाती बोल वाढला वाद

-इंजि. नागनाथ कलवले
लातूर ९७६४७ ८८२८८

# 'विकसित भारत रोजगार व आजीविका हमी मिशन' अंमलबजावणीला १ जुलैपासून प्रारंभ

**लातूर/प्रतिनिधी:** केंद्र शासनाच्या विकसित भारत २०४७ या राष्ट्रीय दृष्टिकोनाशी सुसंगत आणि समृद्ध व सक्षम ग्रामीण भारताच्या निर्मितीसाठी 'विकसित भारत – रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण)' अर्थात 'ठ-च् ॠ अधिनियम, २०२५' लागू करण्यात आला असून याद्वारे अकुशल शारीरिक काम करण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक ग्रामीण कुटुंबातील प्रौढ सदस्यांना आता प्रति आर्थिक वर्ष १२५ दिवसांच्या मजुरी-रोजगाराची वैधानिक हमी मिळणार आहे. या मिशनची अंमलबजावणी आज अर्थात १ जुलै २०२६ पासून सुरु होत आहे. या योजनेसाठी जिल्हाधिकारी हे जिल्हा कार्यक्रम समन्वयक, तर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे सह कार्यक्रम समन्वयक असणार आहेत.

या अधिनियमांतर्गत हाती घेण्यात येणारे सर्व प्रकल्प हे विकसित भारत राष्ट्रीय ग्रामीण पायाभूत सुविधा स्टॅकचा भाग असतील, ज्यामध्ये प्रामुख्याने जलसुरक्षा व जलसंवर्धन, मूलभूत ग्रामीण पायाभूत सुविधा, उपजीविका आधारित पायाभूत सुविधा आणि आपत्ती प्रतिबंधक कामे अशा चार प्रमुख श्रेणींमधील कामांचा समावेश करण्यात आला आहे. ग्रामीण मजुरांना रोजगार उपलब्ध करून देतानाच शेतीच्या पीक हंगामात, विशेषतः पेरणी व कापणीच्या वेळी शेतमजुरांची टंचाई भासू नये, यासाठी राज्यांना एका आर्थिक वर्षात एकूण ६० दिवसांचा कालावधी आगाऊ अधिसूचित करण्याचा अधिकार देण्यात आला असून या काळात या अधिनियमांतर्गत कोणतीही कामे राबवली जाणार नाहीत. मनरेगामध्ये २६६ कामाचा समावेश होता, तर 'विकसित भारत – रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) अंतर्गत ३१८ कामे समविष्ट करण्यात आली आहेत.

या योजनेच्या एकूण देखरेखीसाठी राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर संचालन समित्या कार्यरत राहतील तर जिल्हा स्तरावर संपूर्ण नियोजन, अंमलबजावणी आणि समन्वयाची जबाबदारी जिल्हा कार्यक्रम समन्वयक म्हणून जिल्हाधिकाऱ्यांची असेल. या योजनेची प्राथमिक अंमलबजावणी संस्था म्हणून ग्रामपंचायत काम करणार असून मजूर नोंदणी, रोजगार हमी कार्ड जारी करणे आणि प्राधान्यक्रमानुसार किमान ५० टक्के कामांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी तिच्यावर असेल.

योजनेमध्ये संपूर्ण पारदर्शकता आणि जबाबदारी निश्चित करण्यासाठी बायोमेट्रिक प्रमाणीकरण, अवकाशीय तंत्रज्ञानाधारित नियोजन, मोबाईल व डॅशबोर्ड संनियंत्रण आणि साप्ताहिक सार्वजनिक प्रकटीकरण प्रणालीचा वापर केला जाईल, तसेच ग्रामसभेद्वारे नियमित सामाजिक लेखापरीक्षण केले जाईल. अकुशल शारीरिक कामांसाठीचे मजुरी दर केंद्र सरकारकडून निश्चित केले जातील आणि स्वतंत्र दर अधिसूचित होईपर्यंत मनरेगा अंतर्गतचे दर लागू राहतील. मजुरी अदायगीत विलंब झाल्यास भरपाईची तरतूद असून, कामाची मागणी केल्यानंतर निर्धारित कालावधीत काम उपलब्ध न झाल्यास बेरोजगारी भत्ता देण्याची जबाबदारी संबंधित राज्य सरकारची असेल. सध्या मनरेगा अंतर्गत सुरू असलेली कामे बंद न करता चालू ठेवून ती पूर्ण केली जातील आणि नवीन कायद्याची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर अपूर्ण कामांसोबतच नवीन कामे हाती घेतली जातील. १ जुलै पासून कोणताही खंड न पडू देता अकुशल कामांचे मस्टर काढण्यात येत आहेत.

# लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल मध्ये वसंतराव नाईक जयंती साजरी



**लातूर/प्रतिनिधी:** लातूर परिसरातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल मध्ये वसंतराव नाईक यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. सर्व प्रथम वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे अध्यक्ष श्रीकृष्ण लाटे, प्राचार्या रुपाली कुलकर्णी, शाळेचे समन्वयक रौफ शेख, शाळेच्या समन्वयिका रुपाली कोकाटे, नम्रता झांबरे, विद्या पाटील, संगीता शेटे यांच्या हस्ते झाले.

शाळेच्या शिक्षिका नम्रता डांगे यांनी शेतकरी सुखी तर देश सुखी; या वाक्याने कार्यक्रमाची सुरवात करून वसंतराव नाईक यांच्या विषयी सविस्तर माहिती दिली. वसंतराव नाईक हे महाराष्ट्राचे चौथे आणि सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलेले नेते होते. त्यांना आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार; आणि महाराष्ट्रातील हरितक्रांतीचे जनक; मानले जाते त्यांच्या स्मरणार्थ १ जुलै हा दिवस महाराष्ट्रात कृषिदिन म्हणून साजरा केला जातोया प्रसंगी शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांनी वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस आभिवादन केले.

या कार्यक्रमाचे सूत्र संचलन शाळेच्या शिक्षिका साक्षी मुंडे यांनी केले, यावेळी शाळेचे शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**महामार्गावरील टोल नियमात मोठा बदल...**

## चिमटा



दयाचा

विकासाची कामे
झळकतात पेपरात!
वाचुन होते समाधान!!
विकास वाढदिवसी कळतो
त्यामुळे होते समाधान!!!

# सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अहमदपूर येथील दोघाविरुद्ध हद्दपारीची कारवाई

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, सर्वसामान्य नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण करणे तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करणे, या उद्देशाने पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पोलीस दलामार्फत सातत्याने कठोर कारवाया करण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने अहमदपूर पोलीस ठाण्याने सादर केलेल्या प्रस्तावांच्या आधारे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या दोन सराईत इसमांविरुद्ध मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ५६ अन्वये हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे.

या बाबत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, अहमदपूर पोलीस ठाण्याने सादर केलेल्या प्रस्तावानुसार अमोल अशोक तरडे (रा. थोडगा, ता. अहमदपूर, जि. लातूर) याच्याविरुद्ध सन २०२० ते २०२५ या कालावधीत मारहाण, जीवे मारण्याची धमकी, शिवीगाळ, महिलांचा विनयभंग, अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये दाखल गुन्हे, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमातील गुन्हे तसेच सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्या अनेक गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांची नोंद आहे. त्याच्या सातत्यपूर्ण गुन्हेगारी कृत्यांमुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिक उघडपणे तक्रार करण्यास व साक्ष देण्यास धजावत नसल्याचे चौकशीत स्पष्ट झाले.

तसेच अनिता राम जाधव (रा. भारत कॉलनी, अहमदपूर, ता. अहमदपूर, जि. लातूर) हिच्याविरुद्धही सातत्याने गुन्हेगारी स्वरूपाच्या कृत्यांमुळे सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेला बाधा निर्माण होत असल्याने तिच्याविरुद्ध मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ५६ अन्वये हद्दपारीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. संबंधित प्रस्तावाची सखोल छाननी करून तिच्याविरुद्धही हद्दपारीचा आदेश पारित करण्यात आला आहे.

या दोन्ही प्रस्तावांवर उपविभागीय पोलीस अधिकारी, अहमदपूर यांनी सखोल चौकशी करून अहवाल सादर केला. संबंधित आरोपींचा गुन्हेगारी इतिहास, उपलब्ध पुरावे, गोपनीय चौकशी अहवाल तसेच कायदा व सुव्यवस्थेवर होणारा परिणाम यांचा सर्वंकष विचार करून उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, अहमदपूर डॉ. मंजुषा लटपटे यांनी मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ५६ अन्वये दोन्ही सराईत इसमांना तीन महिन्यांच्या कालावधीसाठी लातूर जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश दिनांक ०४ जून २०२६ रोजी पारित केले आहेत. सदर आदेशानुसार संबंधित हद्दपार इसमांनी आदेश प्राप्त झाल्यानंतर निर्धारित मुदतीत लातूर जिल्ह्याची हद्द सोडणे बंधनकारक असून ०४ जून २०२६ ते ०४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय लातूर जिल्ह्यात प्रवेश करता येणार नाही. तसेच हद्दपारीच्या कालावधीत वास्तव्याच्या ठिकाणाची माहिती संबंधित पोलीस ठाण्यास देणे व नियमानुसार हजेरी लावणेही बंधनकारक राहणार आहे. लातूर जिल्हा पोलीस दलामार्फत सार्वजनिक शांततेला बाधा आणणाऱ्या, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या तसेच वारंवार गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगारांविरुद्ध भविष्यातही मुंबई पोलीस अधिनियमातील प्रतिबंधात्मक तरतुदींचा प्रभावी वापर करून कठोर कारवाई सातत्याने करण्यात येणार असल्याचे जिल्हा पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## ठाकरेंच्या पक्षाला आणखिन एक झटका...

उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला आणखिन एक झटका बसला आहे. उद्धव ठाकरे पक्षाचे सहा खासदार सोडुन गेले यांच्या मतदार संघात दौरा केला व जोरदार भाषणे झाली. संजय राऊत यांची टिका ही जनतेनी एकली. आता उद्धव ठाकरे गटातून आऊट गोईंग होणार नाही असे वाटत असताना सचिन अहिर यांनी एकनाथ शिंदे यांच्या सोबत जावून मोठा झटका दिला आहे. वास्तविक राज्याच्या विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनात विविध विषयांवरून सत्ताधारी आणि विरोधक आमने-सामने येत असल्याचे पाहायला मिळत आहे. यातच विधानपरिषदेच्या उपसभापतीपदाची निवडणूक जाहीर झाली आहे. त्यामुळे उपसभापतीपदावर नेमके कोणाची वर्णी लागणार? याकडे अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले होते. असे असतानाच एक मोठी घडामोड समोर आली. शिवसेना (ठाकरे) पक्षाचे आमदार सचिन अहिर यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून विधानपरिषदेच्या उपसभापतीपदासाठी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्यासाठी हा सर्वात मोठा धक्का मानला जात आहे. काही दिवसांपूर्वीच उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या सहा खासदारांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यानंतर आठ दिवसांतच एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना हा दुसरा मोठा धक्का दिला आहे. विविध या बाबत प्रतिक्रिया देत आहेत यात मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, सचिन अहिर मूळ शिवसैनिक आहेत. त्यांनी पक्षांतर केलेले नसून शिवसेनेत प्रवेश केला आहे. उबाठामध्ये असणारा असंतोष आपल्याला पुन्हा एकदा पाहायला मिळाला आहे. तिकडे यांची मानसिकता ढासळली आहे म्हणून हे सगळे आमच्याकडे येत आहेत. सचिन अहिर यांना तिकडे दाबण्याचा प्रयत्न झाला होता. त्याचा हा स्फोट झाला आहे. सर्वात मोठी बाब म्हणजे नुकतेच सहा खासदार हे एकनाथ शिंदे यांच्याकडे गेल्यास तातडीने सहा मतदारसंघात उद्धव ठाकरे यांनी दौरा केला, हाच दौर जर आगोदर केला असता तर मनातील नारजगी दुर केली असती. दूर गेल्यावरही मोठी टिका केली जाते हे योग्य नाही. वास्तविक हे गेले त कट्टर शिवसैनिक होते. ते जर भाजपा किंवा राष्ट्रवादी तसेच कॉंग्रेसमध्ये गेले असते तर गद्दार वगैरे म्हटले तर ठिक, वास्तविक तेही अयोग्य आहे. ज्यांची-त्यांची मर्जी असते. जाणाऱ्यांनी विचारपुर्वक वागले पाहिजे. वास्तविक एकनाथ शिंदे यांची शिवसेना हिदुहृयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचीच आहे. वास्तविक दोन सेना एकत्र येण्यासाठी कोणी प्रामाणिक प्रयत्न करीत नाहीत. उलट दूर जाव्यात अशीच योजना केल्याचे दिसून येते. ती योग्य नाही. आनंद दिघे व हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या तालमित वाढलेले शिवसैनिक आहेत. ही बाब लक्षात ठेवली पाहिजे. सचिन अहिर हे एकनाथ शिंदे यांच्याकडे आल्याने आगामी काळात ऑपरेशन टायगर दोन होण्याची शक्यता आहे. ती अलिकडील हालचाली ओळखुन आमदार दूर जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. धाराशिवचे आमदार हे खासदाराचे चांगले घनिष्ठ मित्रसंबंध आहेत, त्यामुळे मित्राशिवाय दूर राहातीलच असे नाही, त्यामुळे उद्धव ठाकरे यांना आगामी काळ हा कठिण जाणार यात शंका घेण्याचे कारण नाही. एकतर नवु पैकी सहा खासदार दुर गेले उरले तीन! म्हणजे तीन ही लोकसभेत कमी संख्या आहे. लाजीरवाणी बाब आहे. एकीकडे हिंदुहृयसम्राटचे नाव घेता व पक्ष टिकविणे अशक्य कार्य करता हे योग्य नाही. सहा खासदारापेक्षा सचिन अहिर एकनाथ शिंदे यांच्या गटात जाणे उद्धव ठाकरे व त्यांच्या चिरंजीवासाठी योग्य बाब नाही. आज सचिन अहिर यांचे मुंबईत मोठे वर्चस्व आहे. मुंबईत एकनाथ शिंदे यांची ताकद वाढत आहे तर उद्धवजींची कमी होताना दिसून येत आहे. अशा प्रकारेमुळे मराठी माणूस बुचकाळ्यात पडत आहे. एवढेच समाधान एका शिवसेनेतून दुसऱ्या शिवसेनेत जात आहेत. दुसऱ्या पक्षात गेल्यास शिवसेनेचे खच्चीकरण हे पाहावणार नाही. तसे पाहिले तर हिंदुहृयसम्राट बाळासाहेबांचा आदर ठेवुन चालत आहे. आज फुटलेले सर्वच हिंदुह्यसम्राट बाळासाहेबांना मानता, आदर ठेवतात हे लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे सहा खासदार दूर गेले, त्यांना एक महिणाही झाला नाही. सचिन अहिर सारखा नेता उद्धवजी पासून दूर गेला या बाबत चिंतन होणे अपेक्षित आहे. सतत शिव्या किंवा अपशब्द वापरू नये. ते आज दूर गेले याचा अर्थ ते कायमचे दुरावले असे होत नाही. त्यामुळे सर्वात मोठे दुदैव उद्धवजी यांच्यागटाकडून कोणते होत आहे तर मने दुखविण्याचे! काही ही अपशब्द बोलू नका. बोलल्याने मने दुखविली जात आहेत. यावर उपाय नाही त्यामुळे मने दुखविण्यापेक्षा मने जोडण्याचे काम केले पाहिजे. काही झाले तरी एकदा शिवसैनिक बनला की, तो मरे पर्यंत शिवसैनिक राहातो. मग कोणत्याही पक्षात गेला तरी शिवसेनेचा बाणा कमी होत नाही. हे लक्षात ठेवले पाहिजे. शिवसैनिक तो कदापी हिंदुत्व विसरू शकत नाही. कायम हिंदुत्वासाठी लढणारा ठरतो. त्यामुळे संजय राऊत यांना राग आला की कोणतेही भान राहात नाही. राग लवकर येतो. तसे पाहिले तर स्वभावाला औषध किंवा उपचार नसतात. त्यामुळे दुर गेलेल्या शिवसैनिकांनी संजय राऊत यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले पाहिजे. वाद करीत बसाल तर नाराजीकीत वाढ होते. वास्तविक उद्धव ठाकरे यांनी टिका-टिप्पनी करण्यापेक्षा हिंदुत्वाचे काम चालू ठेवले पाहिजे. जर हिंदुत्त्व विसरून चालाल तर काय होते याचा अनुभव आलेला आहे. भाजपा व एकनाथ शिंदे आदि जे हिंदुत्त्वाला धरून आहेत मात्र दुसरे नाहीत. ते त्यांच्या सणाच्या पार्टीत जातात. ममता बॅनर्जी यांना मोठा धडा मतदार नागरिकांनी याच बाबीवरून शिकविला. सणात मुक्या प्राण्याची हत्त्या करून रक्ताचे पाट वाहात असतील तर ते योग्य नाही. जगण्याचा अधिकार सर्वांना आहे. बळीच्या व धर्माच्या नावाखाली केलेले कृत्य आता जनता जाणून घेत आहे. त्यामुळे चुकीच्या व्यक्ती बरोबर गेले त्यामुळे मोठी किंमत मोजावी लागत आहे ही चुक समजुन घेवून वाटचाल करण्यापेक्षा खालच्या स्तरात बोलणे टाळणे ठाकरे गटास लाभदायक ठरणारे आहे. आगामी काळात अजून शिवसेनेत धक्के जाणवतील असे दिसून येत आहे. खासदार गेले मात्र सचिन अहिर सारखा व्यक्ती जाणे ही धोक्याची घंटा आहे.

# महाकर्जमुक्तीच्या पलीकडचा विचार

महाराष्ट्राच्या कृषी इतिहासात काही निर्णय हे केवळ प्रशासकीय निर्णय म्हणून नोंदले जात नाहीत, तर ते शासनाच्या व्यापक दृष्टिकोनाचे प्रतीक ठरतात. राज्य शासनाने नुकतीच जाहीर केलेली 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' ही अशाच प्रकारची योजना आहे. ही योजना केवळ कर्जमाफी देणारी योजना नसून शेतकऱ्याला आर्थिक स्थैर्य, नव्याने पतपुरवठा आणि शाश्वत शेतीच्या दिशेने नेणारा एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून पाहिली जात आहे.

२०१४ मध्ये राज्याचे मुख्यमंत्रीपद भूषवल्यापासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शाश्वत शेतीचा पुरस्कार केला आहे. महाराष्ट्रातील शेती आजही मोठ्या प्रमाणावर निसर्गावर अवलंबून आहे. दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, महापूर, हवामानातील अनिश्चितता आणि उत्पादन खर्चातील वाढ या अनेक कारणांमुळे शेतकरी वारंवार आर्थिक संकटात सापडतो. अशा परिस्थितीत कर्ज हा शेतीचा अविभाज्य भाग बनतो. परंतु जेव्हा हे कर्ज परतफेडीच्या क्षमतेपलीकडे जाते, तेव्हा त्याचे रूप आर्थिक विवंचनेत बदलते. त्यामुळे शेतकऱ्याला दिलासा देण्यासाठी शासनाने यापूर्वीही विविध कर्जमुक्ती योजना राबवल्या होत्या. मात्र या वेळी शासनाने केवळ कर्जमुक्तीचा विचार न करता भविष्यात शेतकरी पुन्हा त्याच परिस्थितीत अडकणार नाही यासाठी व्यापक दृष्टीकोन स्वीकारला आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव या योजनेला देण्यात आले आहे, यालाही विशेष महत्त्व आहे. लोककल्याणकारी शासन, जलसंधारण, सिंचन व्यवस्था, ग्रामीण विकास आणि रयतेच्या हिताचा सातत्याने विचार करणाऱ्या अहिल्यादेवींच्या कार्याचा आदर्श आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाशी निगडित या योजनेला त्यांचे नाव देऊन शासनाने इतिहासातील लोकाभिमुख परंपरेला अभिवादन केले आहे. या योजनेचा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे तिची रचना. यापूर्वी अनेकदा असे होत असे की दोन लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा थोडी जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना कोणताही लाभ मिळत नसे. एखाद्या शेतकऱ्याचे कर्ज दोन लाख दहा हजार रुपये असले तरी तो संपूर्णपणे अपात्र ठरत असे. त्यामुळे अनेक पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहत होते. यावेळी शासनाने ही त्रुटी दूर केली आहे. दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनी अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती शासनाकडून मिळणार आहे. त्यामुळे हजारो शेतकऱ्यांना नव्याने कर्ज घेण्याचा आणि शेती उभी करण्याचा मार्ग खुला होणार आहे.

या योजनेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान. अनेकदा चर्चेत केवळ थकीत कर्जदार येतात; मात्र वेळेवर कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांनाही प्रोत्साहन मिळणे आवश्यक असते. ही बाब लक्षात घेऊन शासनाने पन्नास हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णय घेतला आहे. आर्थिक शिस्त राखणाऱ्या आणि प्रामाणिकपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी हा मोठा दिलासा आहे.

योजनेचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे एकवेळ समझोता योजना अर्थात वन टाइम सेटलमेंट (ओटीएस). अनेक शेतकऱ्यांची थकबाकी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक असल्याने ते संपूर्ण कर्जमुक्तीच्या चौकटीत बसत नव्हते. आता अशा शेतकऱ्यांना अतिरिक्त रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे तातडीचा आर्थिक भार कमी होऊन त्यांना नियोजनबद्ध पद्धतीने कर्जमुक्तीचा लाभ घेता येणार आहे.

मात्र या योजनेचा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे तिच्यामागील शासनाची व्यापक भूमिका. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील शासनाने ही बाब स्पष्टपणे मांडली आहे की, वारंवार कर्जमाफी देणे हे अंतिम समाधान नाही. शेतकरी पुन्हा कर्जाच्या चक्रात का अडकतो, त्याचे उत्पन्न स्थिर का राहत नाही आणि शेती आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम कशी होईल, याचा अभ्यास करण्यासाठी उच्चाधिकार समितीची स्थापना करण्यात आली होती. त्या समितीच्या शिफारशींमधून शेतकऱ्यांच्या दीर्घकालीन सक्षमीकरणाचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यामध्ये सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे तो शाश्वत शेतीचा. प्रत्येक शेतापर्यंत सिंचन सुविधा पोहोचणे, पाण्याचे सक्षम व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शेती उत्पादन खर्च कमी करणे, योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि वेळेवर पतपुरवठा करणे या गोष्टींवर शासनाचा भर आहे. कर्जमुक्ती हा त्यातील एक भाग आहे; परंतु भविष्यात कर्जमाफीची गरजच भासू नये अशी परिस्थिती निर्माण करणे हा त्यामागचा मोठा उद्देश आहे.

राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार असून जवळपास ३६ हजार ५०० कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना मानली जात आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करून शासनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा संदेश दिला आहे.

योजनेची अंमलबजावणीही पूर्णपणे ऑनलाइन आणि पारदर्शक पद्धतीने करण्यात येणार आहे. आधार प्रमाणीकरण, बँकांमधील माहितीची पडताळणी आणि तंत्रज्ञानाधारित प्रक्रिया यामुळे लाभ योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे. राष्ट्रीयकृत, खाजगी, ग्रामीण, जिल्हा बँका तसेच प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांमधील कर्जदारांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे. जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून साधारणता लाभार्थ्यांना याचा लाभ मिळणार आहे. पात्र लाभार्थ्यांच्या तपशीलाचे संकलन बँकामार्फत केले जाणार आहे.

आज महाराष्ट्रातील शेतकरी केवळ आर्थिक मदतीची अपेक्षा करत नाही, तर स्थैर्य, विश्वास आणि विकासाची संधी शोधत आहे. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' ही त्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ही योजना शेतकऱ्याच्या तातडीच्या आर्थिक अडचणी दूर करेलच; पण त्याचबरोबर सिंचन, पतपुरवठा, तांत्रिक सक्षमीकरण आणि शाश्वत शेतीच्या माध्यमातून भविष्यातील सक्षम कृषी व्यवस्थेची पायाभरणी करण्याचाही प्रयत्न करेल.

म्हणूनच या निर्णयाकडे केवळ कर्जमाफी म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. हा निर्णय शेतकऱ्याच्या आत्मविश्वासाचे पुनरुज्जीवन, ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना आणि शेतीच्या शाश्वत विकासासाठी उचललेले एक धाडसी पाऊल म्हणून पाहिले पाहिजे. महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्राला नवसंजीवनी देण्याची क्षमता या योजनेत आहे आणि म्हणूनच ही योजना महाकर्जमुक्तीच्या पलीकडे जाऊन शेतकरी सक्षमीकरणाची नवी दिशा ठरू शकते.

**– प्रवीण टाके,**
**उपसंचालक (माहिती),**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**कोल्हापूर.**

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी शेतकऱ्यांनी कर्जखात्याला 'आधार' संलग्न करावे- जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था विष्णू पोतंगले

राज्य शासनाने राज्यातील बळीराजाला मोठा दिलासा देण्यासाठी घोषित केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती' अंमलबजावणी आता अंतिम टप्यात आहे. या योजनेचा थेट लाभ शेतकऱ्यांना लवकर मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी आपली आधार माहिती बँकेच्या शाखेत द्यावी असे आवाहन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था विष्णू पोतंगले यांनी केले आहे.




आधार प्रमाणीकरण पूर्ण होताच, जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर लाभाची रक्कम जमा करण्याचे सहकार विभागाचे नियोजन आहे. या महत्त्वाकांक्षी योजनेमुळे महाराष्ट्रातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांची आर्थिक मदत मिळणार आहे.

सहकार आयुक्त व निबंधक तसेच जिल्हा बॅकर्स समितीकडून व्यापारी आणि सहकारी बँकांना पात्र शेतकऱ्यांचे आधार क्रमांक घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. योजनेच्या पारदर्शक अंमलबजावणीसाठी सर्व बँकांकडील पात्र शेतकऱ्यांची कर्ज खात्याची माहिती अपलोड झाल्यानंतर पात्र शेतकऱ्यांना स्वतंत्र विशिष्ट कर्ज खातेनिहाय नंबर दिला जाणार आहे. पात्र शेतकऱ्यांची यादी बँक शाखा, ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय आणि पोर्टलवर प्रसिद्ध केली जाणार आहे.

आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून थेट संबंधित शेतकऱ्याच्या कर्जखात्यात लाभाची रक्कम जमा केली जाणार आहे. या योजनेचा लाभ मिळालेल्या शेकऱ्यांना चालू हंगामासाठी नव्याने कर्ज पुरवठा करण्याच्या सूचना सर्व बँकांना देण्यात आल्या आहेत. या योजनेमधील पात्र सर्व शेतकरी नवीन पीक कर्ज घेऊ शकतील.

**या योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये आणि तरतुदी**

या योजनेअंतर्गत २ लाख रुपयांपर्यंतची अल्पमुदतीची पीक कर्जमुक्ती केली जाईल. यामध्ये थकीत, पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जांचाही समावेश आहे. ज्या शेतकऱ्यांचे कर्ज २ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांच्यासाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी दोन लाखावरील रक्कम बँकेत भरल्यानंतर त्यांना दोन लाखाच्या कर्जमुक्तीचा लाभ देण्यात देणार आहे.

**नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहन**

प्रामाणिकपणे व नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी त्यांना ५० हजार रुपयांपर्यंतचे प्रोत्साहनपर अनुदान दिले जाणार आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीच्या कर्जमाफी योजनांचा लाभ घेतलेले शेतकरीही या प्रोत्साहनपर लाभासाठी पात्र असणार आहेत.

या योजनेचा उद्देश केवळ कर्जमाफी देणे एवढाच नसून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आणि राज्यातील शेती क्षेत्राला नवसंजीवनी देणे हा आहे. शेतकऱ्यांनी कोणत्याही विलंबाशिवाय बँकेत जाऊन आपले कर्ज खाते आधारशी संलग्न करून घ्यावे. असे आवाहन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना : बळीराजाच्या स्वाभिमानाला नवे बळ!

महाराष्ट्र ही संतांची, पुरोगामी विचारांची आणि अहोरात्र कष्ट करणाऱ्या बळीराजाची भूमी आहे. राज्याची अर्थव्यवस्था, ग्रामीण विकास आणि सामाजिक जीवनाची वीण ही शेती व शेतकऱ्यांच्या अथक परिश्रमांवर उभी आहे. निसर्गाची अनिश्चितता, अवकाळी पाऊस, दुष्काळ, बाजारभावातील चढ-उतार आणि वाढता उत्पादन खर्च अशा असंख्य संकटांचा सामना करत अन्नदाता आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहतो. अशा या शेतकऱ्याला केवळ सहानुभूतीची नव्हे, तर आर्थिक स्थैर्य, विश्वास आणि शासनाच्या भक्कम पाठबळाची आवश्यकता असते.

याच भावनेतून महाराष्ट्र शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' जाहीर केली आहे. ही योजना केवळ कर्जमाफीची घोषणा नसून, शेतकऱ्यांच्या स्वाभिमानाला बळ देणारे, ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी गती देणारे आणि शेती क्षेत्रात नवचैतन्य निर्माण करणारे एक ऐतिहासिक पाऊल आहे. महाराष्ट्रात दरवर्षी १ जुलै हा दिवस 'कृषी दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि हरित क्रांतीचे प्रणेते स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. आधुनिक शेती, सिंचन, पीकपद्धतीतील बदल आणि कृषी विकासाच्या दूरदृष्टीपूर्ण धोरणांमुळे त्यांनी महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबनाच्या दिशेने नेले. 'शेतकरी समृद्ध झाला तरच राज्य समृद्ध होईल,' हा त्यांचा दूरदर्शी विचार आजही तितकाच प्रेरणादायी आहे.

स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या याच विचारांचा वारसा पुढे नेत महाराष्ट्र शासनाने जून २०२६ मध्ये राज्यातील शेतकऱ्यांसाठी




महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत थकबाकीदार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतच्या पीककर्जाची माफी जाहीर करण्यात आली आहे. त्याचबरोबर, प्रतिकूल परिस्थितीतही प्रामाणिकपणे कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या शिस्तीचा आणि प्रामाणिकपणाचा सन्मान करत त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे. त्यामुळे ही योजना केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित न राहता, आर्थिक शिस्तीलाही प्रोत्साहन देणारी ठरते.

राज्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी शासन कटिबद्ध आहे. राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेअंतर्गत ५६ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना सुमारे ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विविध कर्जमाफी योजना राबविल्या आहेत. दुष्काळ, अतिवृष्टी आणि इतर संकटांमुळे प्रभावित झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य शासनाने विविध कालखंडात कर्जमुक्तीचे निर्णय घेतले. या योजनांमुळे लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून त्यांना पुन्हा शेती व्यवसाय उभा करण्याची संधी मिळाली.

याशिवाय, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज असलेल्या आणि ज्यांची खाती बँकांकडे अनुत्पादित मालमत्ता (एनपीए) म्हणून वर्गीकृत झाली आहेत, अशा शेतकऱ्यांसाठीही शासनाने दिलासादायक भूमिका घेतली आहे. बँकांसोबत 'एकवेळ समझोता' (One Time Settlement - OTS) करण्याच्या माध्यमातून या शेतकऱ्यांना नव्याने आर्थिक प्रवाहात सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या योजनेत करण्यात आला आहे. त्यामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना नव्याने उभारी मिळण्याचा मार्ग खुला होणार आहे.

कोणतीही योजना केवळ घोषणांपुरती मर्यादित न राहता तिचा लाभ शेवटच्या लाभार्थ्यापर्यंत पारदर्शक, वेगवान आणि प्रभावीपणे पोहोचला पाहिजे, या भूमिकेतून शासनाने अंमलबजावणीची मजबूत यंत्रणा उभारली आहे. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी थेट मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली आहे. जिल्हानिहाय आवश्यक निधीची तातडीने उपलब्धता करून देण्यात आली असून, महाआयटीच्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया डिजिटल, पारदर्शक आणि वेळबद्ध करण्यात आली आहे. शासनाच्या कार्यपद्धतीतील ही गतिमानता आणि उत्तरदायित्व या योजनेच्या यशाला अधिक बळकटी देणारे ठरणार आहे.

ही कर्जमुक्ती योजना म्हणजे केवळ आर्थिक मदतीचा कार्यक्रम नाही; तर बळीराजाच्या आत्मविश्वासाला नवसंजीवनी देणारा, त्याच्या स्वाभिमानाचा सन्मान करणारा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नव्या उमेदीने पुढे नेणारा परिवर्तनाचा संकल्प आहे. कृषी दिनाच्या पावन निमित्ताने शेतकऱ्यांच्या हितासाठी उचललेले हे ऐतिहासिक पाऊल महत्वाचे ठरणार आहे. या योजनेच्या बळावर महाराष्ट्रातील बळीराजा नव्या आत्मविश्वासाने उभारी घेईल, शेती अधिक सक्षम बनेल आणि ग्रामीण समृद्धीचा नवा अध्याय लिहिला जाईल.

**–वर्षा फडके – आंधळे**
**उपसंचालक (वृत्त)**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

# मध्य रेल्वेच्या खेळाडूंची 'कॉमनवेल्थ गेम्स-२०२६' साठी 'टीम इंडिया'मध्ये निवड






**मुंबई/प्रतिनिधी:** स्कॉटलंडमधील ग्लासगो येथे दिनांक २३ जुलै २०२६ ते दिनांक २ ऑगस्ट २०२६ या कालावधीत होणाऱ्या प्रतिष्ठित 'कॉमनवेल्थ गेम्स' -२०२६ मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी मध्य रेल्वेच्या दोन खेळाडूंची निवड झाली आहे, ही बाब मध्य रेल्वेसाठी अत्यंत अभिमानास्पद आहे. ही कामगिरी क्रीडा-गुणवत्तेचा शोध घेणे, तिला जोपासणे आणि प्रोत्साहन देणे यांत मध्य रेल्वेने दिलेल्या अमूल्य योगदानाचा पुरावा आहे.

मध्य रेल्वे 'कॉमनवेल्थ गेम्स' -२०२६ साठी निवड झालेल्या खालील खेळाडूंची अभिमानाने घोषणा करीत आहे.

१. श्री तेजस शिर्से - ११० मीटर अडथळ्यांची शर्यत आणि
२. श्री समरदीप सिंग गिल - गोळाफेक

मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातील हे दोन्ही खेळाडू आहेत. श्री तेजस शिर्से, कमर्शियल क्लर्क सह तिकीट कलेक्टर म्हणून आणि श्री. समरदीप सिंग गिल, वरिष्ठ लिपिक कार्यरत आहेत. त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सातत्याने उत्कृष्ट कामगिरी केली असून भारतीय रेल्वे व मध्य रेल्वेचे नाव उंचावले आहे. त्यांची 'कॉमनवेल्थ गेम्स' -२०२६ साठी झालेली निवड ही त्यांच्या कठोर परिश्रमांचे, निष्ठेचे आणि 'मध्य रेल्वे क्रीडा असोसिएशन'ने पुरवलेल्या भक्कम आधार प्रणालीचे फळ आहे.

जागतिक दर्जाच्या प्रशिक्षण सुविधा, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, स्पर्धात्मक सामन्यांचा अनुभव आणि व्यावसायिक कर्तव्ये व क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी यांचा समतोल साधण्यासाठी योग्य वातावरण उपलब्ध करून देऊन अनेक खेळाडूंची कारकीर्द घडवण्यात 'मध्य रेल्वे क्रीडा असोसिएशन'ने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. असोसिएशनच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे मध्य रेल्वे राष्ट्रीय स्तरावर क्रीडा गुणवत्तेचे एक प्रमुख केंद्र बनली आहे.

दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन करतानाच प्रशिक्षक आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांचीही मध्य रेल्वेने प्रशंसा केली आहे. मध्य रेल्वे श्री तेजस शिर्से आणि श्री समरदीप सिंग गिल यांना 'कॉमनवेल्थ गेम्स-२०२६' साठी शुभेच्छा देत आहे. हे खेळाडू आपल्या कामगिरीने देश आणि रेल्वे परिवाराचा गौरव वाढवतील याची खात्री आहे.

मध्य रेल्वे क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी आणि खेळाडूंना घडवण्यासाठी कटिबद्ध आहे तसेच उत्कृष्टतेच्या ध्येयपूर्तीसाठी आपल्या खेळाडूंना सतत पाठिंबा देत आहे.

# 'एल निनो'चे संभाव्य संकट जलसंधारणासाठी इष्टापत्ती; कमी कालावधीत पूर्ण होऊ शकणारी जलसंधारणाची कामे प्राधान्याने पूर्ण करा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी:** विविध हवामान संस्थांनी या वर्षीच्या पावसाळ्यामध्ये 'एल निनो'बाबत दिलेल्या इशाऱ्यांबाबत शासन गंभीर आहे. यामुळे निर्माण होऊ शकणारी संभाव्य टंचाई परिस्थिती यशस्वीपणे हाताळण्यासाठी शासन सज्ज आहे. त्यामुळे एल निनोचे संभाव्य संकट हे जलसंधारणासाठी इष्टापत्ती असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कमी कालावधीमध्ये पूर्ण होऊ शकणारी जलसंधारणाची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश दिले.



विधान भवनातील मंत्रिमंडळ सभागृहात आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. बैठकीस जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) मंत्री गिरीश महाजन, जलसंपदा (कृष्णा आणि गोदावरी खोरे पाटबंधारे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड उपस्थित होते.

राज्यामध्ये नादुरुस्त असलेले कोल्हापुरी बंधाऱ्यांना प्राधान्याने दुरुस्त करण्यासाठी धडक कार्यक्रम राबवण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नादुरुस्त असलेले कोल्हापुरी बंधारे 'आर्च पद्धतीने ' पुलवजा करण्याबाबत पडताळणी करण्यात यावी. जलसंधारणाचे कुठलेही नवीन काम न घेता दुरुस्तीची कामे प्राधान्याने पूर्ण करावी. आपत्ती व्यवस्थापन विभागाने मागील वर्षांमध्ये महाराष्ट्रातील गंभीर दुष्काळी परिस्थिती असलेले भाग चिन्हांकित करावे. संबंधित भागात तत्कालीन परिस्थितीमध्ये राबविण्यात आलेल्या उपाययोजनांच्या अहवाल द्यावा. त्यावर आधारित किंवा आवश्यक ते बदल करून यावेळी उपाययोजना करण्यात याव्यात.

कामे पूर्ण करण्यास असलेला कालावधी लक्षात घेता या कामांसाठी गतीने प्रक्रिया राबवावी. नादुरुस्त कोल्हापुरी बंधारे दुरुस्त करण्यासाठी जिल्हा नियोजनमधून निधीची तरतूद करण्यात यावी. नादुरुस्त कोल्हापुरी बंधाऱ्यांमध्ये दुरुस्ती करताना धातू विरहित पद्धतीचा पर्याय शोधण्यात यावा. ही उपाययोजना कायमस्वरूपी असावी. याबाबत यंत्रणा निश्चित करून संबंधित यंत्रणेकडे संपूर्ण जबाबदारी देण्यात यावी. संभाव्य परिस्थिती लक्षात घेता लवकर पूर्ण होतील, अशीच जलसंधारणाची कामे हाती घेण्यात यावीत. याबाबत संपूर्ण कार्यवाहीचे अधिकार पाटबंधारे विकास महामंडळ स्तरावर देण्यात यावेत, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

नादुरुस्त कोल्हापुरी बंधाऱ्यांसोबतच जलस्त्रोतांचे बळकटीकरण करण्यात यावे. यासाठीही कार्यक्रम हाती घेण्यात यावा. राज्यामध्ये कृषी क्षेत्रात सौर ऊर्जा निर्मितीची चांगली परिसंस्था निर्माण होत आहे. यामधून निर्मित होणारी सौर ऊर्जेचे वितरण करण्यात यावे. त्यामुळे पारेषण व्यवस्थित होऊन महावितरणच्या यंत्रणेवर ताण येणार नाही. सौर ऊर्जा विषयक उपकरणांच्या दुरुस्तीसाठी संबंधित गाव, पाड्यात दुरुस्तीबाबत कौशल्य विकासाचा कार्यक्रम राबविण्यात यावा. यामुळे स्थानिक बेरोजगार युवक युवतींना रोजगारही उपलब्ध होईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सोलापूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजी नगर यासारख्या कृषीसाठी विजेचा जास्त वापर असलेल्या जिल्ह्यांसाठी वेगळे नियोजन करण्यात यावे. येथील 'फिडर'वर लोड येऊन 'फिडर' बंद पडण्याच्या घटना घडतात. त्यामुळे शेतकऱ्यांना अखंडित वीजपुरवठा होत नाही. या जिल्ह्यांमध्ये 'फिडर' वर दबाव न येता विजेचे वहन एका फिडरवरून दुसऱ्या फिडरवर करता येईल, अशा पद्धतीने व्यवस्था निर्माण करण्यात यावी.

बैठकीस मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा मुख्यमंत्री यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रविण परदेशी, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता, मृद व जलसंधारण विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले आदी उपस्थित होते, तर विदर्भ, तापी, गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक दूरदृश्य संवाद प्रणाली द्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

**राज्यातील कोल्हापुरी बंधाऱ्यांची स्थिती**

राज्यामध्ये जलसंपदा विभाग आणि मृद व जलसंधारण विभागाकडे कोल्हापुरी बंधारे आहेत. त्यापैकी ९७६ कोल्हापुरी बंधारे जलसंपदा विभागाकडे असून मृद व जलसंधारण विभागाकडे १३६७ कोल्हापुरी बंधारे आहेत. यापैकी नादुरुस्त कोल्हापुरी बंधाऱ्यांच्या दुरुस्तीनंतर २ लाख ३९ हजार १८१ हेक्टर सिंचन क्षमता राज्यात निर्माण होणार आहे.

# अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, धाराशिव जिल्हा अभ्यासवर्ग उत्साहात संपन्न




**धाराशिव/प्रतिनिधी:** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, धाराशिव जिल्ह्याच्या वतीने दिनांक २७ व २८ जून रोजी इरा इंटरनॅशनल स्कूल, सांजा रोड, धाराशिव येथे दोन दिवसीय जिल्हा अभ्यासवर्ग उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

अभ्यासवर्गात जिल्हाभरातून एकूण ४५ कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये ३२ विद्यार्थी,९ विद्यार्थिनी, ४ प्राध्यापकाचा समावेश होता.

या अभ्यासवर्गातील स्व. प्रा. यशवंतराव केळकर प्रदर्शनी कक्षाचे उद्घाटन समता माध्यमिक सेवाभावी शिक्षण संस्थेच्या सचिव प्रा. डॉ. उषा वडने, शहर उपाध्यक्ष प्रा. पूजा मुंढे पाटील व शहर सहमंत्री जयराज शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाले.

संपूर्ण अभ्यासवर्गाला अभाविपचे राष्ट्रीय कार्यकारणी विशेष निमंत्रित सदस्य प्रा. डॉ. सारंग जोशी,प्रदेश सहसंघटन मंत्री श्री. शुभम स्वामी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी कार्यकर्त्यांना अभाविपचे कार्य, विचार, संघटन पद्धती, विद्यार्थी हिताचे प्रश्न तसेच राष्ट्रनिर्माणातील विद्यार्थ्यांची भूमिका याविषयी सखोल मार्गदर्शन केले.

दोन दिवसांच्या या अभ्यासवर्गामध्ये कार्यकर्त्यांनी अभाविपची विचारधारा, कार्यपद्धती आणि विद्यार्थी चळवळीचे महत्त्व यांचा सखोल अभ्यास केला. तसेच राष्ट्रसेवा, समाजकार्य आणि विद्यार्थ्यांचे भविष्य अधिक उज्ज्वल करण्यासाठी समर्पित भावनेने कार्य करण्याचा संकल्प सर्व कार्यकर्त्यांनी केला.

उत्साह, शिस्त आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडलेला हा जिल्हा अभ्यासवर्ग दिनांक २८ जून रोजी आनंददायी वातावरणात यशस्वीरित्या संपन्न झाला.

# 'विकसित भारत रोजगार व अजिवीका हमी अभियान'; १ जुलै रोजी लातूरमध्ये जिल्हास्तरीय शुभारंभ

लातूर,-भारत सरकारद्वारे नव्याने मंजूर करण्यात आलेला 'विकसित भारत रोजगार व अजिवीका हमी अभियान (ग्रामीण)' (व्हीबीजी-राम-जी) अधिनियम-२०२५ हा राज्यात १ जुलै २०२६ पासून सर्वत्र लागू करण्यात येणार आहे. सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम' (मनरेगा) या कायद्याऐवजी आता हा नवीन अधिनियम अस्तित्वात येत आहे. या अभियानाच्या अनुषंगाने २ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता लातूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील डीपीडीसी हॉलमध्ये जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाला जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींना आमंत्रित करण्यात आले असून, त्यांच्यासह बचत गटाच्या महिला सदस्य, योजनेचे लाभार्थी, कामगार युवक आणि स्थानिक ग्रामपंचायत प्रतिनिधी देखील या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमामध्ये योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये आणि त्यातून मिळणारे लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध पोस्टर्स, बॅनर्स आणि घडीपत्रिकांचे (माहिती पुस्तिका) भव्य प्रदर्शनही येथे आयोजित केले जाईल.

**रोजगाराच्या हमीमध्ये वाढ: १०० ऐवजी आता १२५ दिवस काम**

नवीन 'विकसित भारत रोजगार व अजिवीका हमी अभियान (ग्रामीण)' अंतर्गत आता मजुरांना पूर्वीच्या मनरेगा योजनेतील १०० दिवसांच्या रोजगाराऐवजी तब्बल १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी देण्यात आली आहे. हा या नवीन कायद्यातील एक अत्यंत मोठा आणि महत्त्वपूर्ण बदल आहे. सध्या मनरेगा अंतर्गत सुरू असलेली कोणतीही कामे बंद पडणार नसून ती पूर्ववत सुरू राहतील आणि पूर्ण केली जातील. १ जुलैपासून नवीन कायद्याची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर, त्यातील नियमांनुसार नवीन विकासकामे हाती घेतली जातील. जिल्हा प्रशासनाने या नवीन बदलाचे स्वागत करत संबंधित सर्व घटकांना या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# दयानंदच्या एन.सी.सी.कॅडेट्स संगमेश्वर सत्यवान झरे यांचा सत्कार



**लातूर/प्रतिनिधी:** लातूर: येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील एन.सी.सी. कॅडेट्स संगमेश्वर सत्यवान झरे या विद्याथ्याचे भारतीय सैन्य दलामध्ये अग्निवीर म्हणून निवड झाली आहे. त्या निवडीबद्दल दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. संगमेश्वर सत्यवान झरे हा दयानंद विज्ञान महाविद्यालय मध्ये बी.एस्सी. प्रथम वर्षात शिकत असताना जानेवारी २०२६ मध्ये भारतीय सैन्यामध्ये भरती झाला. तो मागील दोन वर्षापासून भारतीय सैन्यात भरती होण्यासाठी प्रयत्न करत होता. त्याची लेखी परीक्षा लातूर येथे झाली तसेच त्याला लेखी परीक्षेमध्ये १०० पैकी ८६ मार्क प्राप्त झाले आणि शारीरिक चाचणी पूणे येथे झाली. सदरील विद्यार्थ्यांने नाशिक येथील -ठढध मध्ये प्रशिक्षण पूर्ण केले असून, त्याची पंजाब राज्यातील फरीदकोट जिल्ह्यात पोस्टिंग झाली आहे. सुरुवातीपासून अभ्यासात सातत्य, मेहनत, जिद्द, चिकाटी व स्वप्न पूर्ण करण्याची जिद्द यामुळे हे यश संपादन झाले.

संगमेश्वर सत्यवान झरे याने इंडियन आर्मीची तयारी एन.सी.सी. मध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेतल्यानंतर सुरु केली होती. तो सकाळी ग्राऊंडची प्रॅक्टिस क्रीडा संकूल येथे करत होता व त्याचा अभ्यास ऑनलाईन यूट्यूब च्या माध्यमाने व कॅप्टन डॉ. विजेंद्र चौधरी यांच्या मार्गदर्शनाने करत होता. कॉलेज करत करत इंडियन आर्मीची तयारी केली व पहिल्याच वर्षी त्याने यश संपादन केले ही दयानंद विज्ञान महाविद्यालयासाठी गौरवाची बाब आहे.

एन.सी.सी.चे कॅडेट्स भारताच्या राष्ट्रनिर्मितीत योगदान देतात. विविध जाती, पंथ आणि संस्कृतींच्या लोकांमध्ये परस्पर संवाद घडवून आणून राष्ट्रीय एकात्मता साधण्यात एन.सी.सी. शिबिरे महत्त्वाची भूमिका बजावतात.राष्ट्र आणि समाजाच्या सेवेत योगदान देण्याच्या, तरुणांना भविष्यासाठी लष्करी प्रशिक्षण देण्याच्या आणि त्यांना सकारात्मक दिशेने वाटचाल करण्यास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने, दयानंद विज्ञान महाविद्यालयाने १९७१ मध्ये नॅशनल कॅडेट कोर्स विभाग सुरू केला. महाविद्यालयाचे एन.सी. सी. युनिट अत्यंत सक्रिय आणि उत्साही आहे. कॅडेट्सनी अनेक शिबिरांमध्ये सहभाग घेतला आहे आणि युनिट स्तरावर विविध उपक्रम आयोजित करण्यात पुढाकार घेतला आहे. याव्यतिरिक्त, बटालियनद्वारे आयोजित एन.सी. सी. कॅम्प व विविध उपक्रमांमध्येही जसे की, एन.सी.सी. दिन साजरा करणे, पल्स पोलिओ मोहीम,रक्तदान शिबिर, एड्स जनजागृती मोहीम आणि गणेशोत्सव साजरा करणे यासाठी कॅडेट्सना प्रोत्साहीत केले जाते.यावर्षी दयानंद विज्ञान महाविद्यालयाने यशाची उज्ज्वल परंपरा कायम राखत नुकत्याच जाहीर झालेल्या पोलीस भरती प्रक्रीयेत आमच्या महाविद्यालयातील एन.सी. सी. कॅडेट्स जिजाऊ विठ्ठल डिगोळे हीची निवड झालेली आहे.त्याच्या या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांनी त्याचे अभिनंदन केले.तसेच महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या हस्ते संगमेश्वर सत्यवान झरे याचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी कॅप्टन डॉ.विजेंद्र चौधरी,डॉ.वाय. पी.सारणीकर,डॉ.जे.एस.अनगुलवार,प्रा. एस.के.आळणे,डॉ.एम.बी.पंडगे,डॉ. एस.एस.कोल्हे, डॉ.एस.डी.लोखंडे, डॉ. टी.एच.मुजावार, डॉ.डी.डी.ढेरे, प्रा.एम. डब्ल्यू. आत्राम, प्रा.ए.एल.ऐळीकर यांच्यासह इतर प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# सोलापुरात भव्य 'श्री संत नरहरी सांस्कृतिक भवन' उभारण्याची मागणी; सोनारसमाजकडून महापौरांना निवेदन

**सोलापूर/प्रतिनिधी:** सोलापूर शहरात संत शिरोमणी श्री नरहरी सोनार महाराज यांच्या नावाने भव्य 'संत नरहरी सांस्कृतिक भवन' उभारण्याची अधिकृत मागणी सोनार समाज संस्था, सोलापूर यांच्यावतीने महापौर श्री. विनायक कोंड्याल यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली.

सांस्कृतिक भवनाची गरज का?

सोलापूर हे संतांची भूमी म्हणून ओळखले जाते. मात्र, संत शिरोमणी नरहरी महाराज - ज्यांनी भक्ती आणि कर्मयोगाचा आदर्श घालून दिला - त्यांच्या नावाने शहरात आजपर्यंत कोणतेही अधिकृत सांस्कृतिक भवन, सभागृह अथवा स्मारक उभारण्यात आलेले नाही, याकडे शिष्टमंडळाने महापौरांचे लक्ष वेधले.

महापौरांकडे ठोस मागणी

महापालिकेच्या नियमानुसार योग्य व मोक्याचा भूखंड निश्चित करून महासभेत तातडीने ठराव मंजूर करावा आणि श्री संत नरहरी महाराज यांच्या नावाने भव्य सांस्कृतिक भवन उभारण्याची प्रशासकीय प्रक्रिया त्वरित सुरू करावी, अशी ठोस व एकमुखी मागणी शिष्टमंडळाने केली.

समाजाच्या भावना तीव्र संत नरहरी महाराज हे केवळ सुवर्णकार समाजाचेच नव्हे, तर संपूर्ण वारकरी संप्रदायाचे आराध्य दैवत आहेत. त्यांच्या कार्याचा व विचारांचा वारसा जपण्यासाठी आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी सोलापुरात त्यांच्या नावाने सांस्कृतिक भवन होणे ही काळाची गरज आहे. हे भवन समाजाच्या सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांसाठी हक्काचे व्यासपीठ ठरेल, असा विश्वास निवेदनात व्यक्त करण्यात आला आहे.



शिष्टमंडळात मान्यवरांची उपस्थितीयावेळी संस्थेचे अध्यक्ष वसंत पोतदार, उपाध्यक्ष विजयकुमार पोतदार, सचिव दत्तगुरु वेदपाठक यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने महापौरांची भेट घेतली.

निवेदनावर संस्थेचे अग्रणी प्रवर्तक मोहन मंद्रूपकर, संजय मैदर्गीकर, संतोष कळमणकर, गिरीश जमखंडीकर, इंजि. विजयकुमार पोतदार, सौ. चित्रा पोतदार, प्रसाद कुमठेकर, सुनील पंडित, संदीप पोतदार, आशुतोष वेदपाठक, संदीप तुळजापूरकर, श्रीनाथ पोतदार, देविदास पोतदार, अमोल दीक्षित, मुरलीधर अंजनगावकर, प्रतीक पोतदार, सौ. मीना वेदपाठक आदी मान्यवरांच्या सह्या आहेत.

आयुक्तांनाही निवेदनया मागणीची एक प्रत महापालिका आयुक्त यांनाही सादर करण्यात आली आहे. आता महापालिकेच्या भूमिकेकडे लक्ष या न्याय्य व रास्त मागणीवर सोलापूर महानगरपालिका प्रशासन व सत्ताधारी कोणती सकारात्मक भूमिका घेते, याकडे आता संपूर्ण सुवर्णकार समाजासह सोलापूरकरांचे लक्ष लागले आहे.

# जीवनातील यश केवळ मार्कांवर नव्हे तर शिस्त व संस्कारांवर ठरते : अमोल तांबे

## श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेचे दहावीच्या परीक्षेत उत्तुंग यश; ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणारे तब्बल १५७ विद्यार्थी

**लातूर/प्रतिनिधी:** एस.एस.सी मार्च २०२६ तसेच सी.बी.एस.ई बोर्डाच्या दहावीच्या परीक्षेच्या निकालात श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेच्या सर्व माध्यमिक शाळांनी उल्लेखनीय यश संपादन करत गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. संस्थेच्या विविध शाळांमधील तब्बल १५७ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटविला आहे. संस्थेतर्फे दयानंद सभागृहात या गुणवंत विद्यार्थी गौरव व शिष्यवृत्ती वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा व पालकांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी होते.

यानंतर आपल्या भाषणात ते म्हणाले की, दहावीतील मार्क ही यशाची पहिली पायरी असून या पुढे अनेक आव्हाने आपल्यासमोर येणार आहेत. त्यावेळी शिस्त आणि संस्कार असतील तरच जीवनात यशस्वी होता येते. लातूर पॅटर्न ही फक्त डॉक्टर इंजिनिअर बनवणारी ‘फॅक्टरी’ नसून शिक्षणाची ‘पंढरी’आहे. कोचिंग क्लास मध्ये ठराविक मुलांनाच मार्क पडतात तर इतर मुले गर्दीत हरवून जातात. शिस्त संस्कार आणि सर्वांगीण विकासासाठी शाळा–कॉलेजला पर्याय नाही. ’टिन एज’ ची संवेदनशीलता ओळखून या काळात विद्यार्थी – पालक यांची योग्य निर्णयक्षमता अत्यंत महत्वाची आहे. आव्हानांचा सामना करण्याची धमक लातूरकरांच्या रक्तात आहे. भूकंप असो, रेल्वेने आणलेले पाणी असो किंवा आता शैक्षणिक क्षेत्रात घडलेल्या घटना असो या सर्वांवर मात करून लातूर पॅटर्न एक नंबरी सोने आहे हे परत सिद्ध होईल.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव ॲड आशिष बाजपाई यांनी केले, आभार प्रदर्शन संयुक्त सह सचिव लक्ष्मीकांत करवा यांनी केले. तर सूत्र संचलन आनंद कुलकर्णी, योगिता संदीकर यांनी केले. यावेळी संस्था अंतर्गत माध्यमिक शाळांतून बोर्ड परीक्षा २०२६ मध्ये ९५% पेक्षा अधिक गुण तसेच महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षा मध्ये घेऊन मेरिट सह उत्तीर्ण होणाऱ्या एकूण ९७ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलचे ६७, श्री मारवाडी राजस्थान विद्यालयाचे ४३, गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालयाचे २४ तर श्री बंकटलाल लाहोटी इंग्लिश स्कूलचे २१ विद्यार्थी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुणांसह उत्तीर्ण झाले. राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी स्वरीत कमलेश खटोड याने ९९.८०% गुणांसह सीबीएसई बोर्डात संस्थेत प्रथम तर लातूर जिल्ह्यात द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच संस्थांतर्गत विद्यालयातून प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये श्री मारवाडी राजस्थान विद्यालयाचा यश वडगावकर, सृष्टी बोबडे, श्रद्धा मोरे, श्रीकांत गिरी यांनी १०० टक्के, गोदावरी लाहोटी कन्या विद्यालयातून प्रतिज्ञा ठाकूर ९९.२० टक्के तर बंकटलाल लाहोटी इंग्लिश स्कूल मधून साई पाटील ९८.२०% यांचा समावेश आहे.

याप्रसंगी सर्व यशस्वी विद्यार्थी, पालक, संस्थेचे अध्यक्ष श्री. शैलेश लाहोटी, सचिव श्री. आशिष बाजपाई, श्री. राजेंद्रकुमार मालपाणी, श्री. दिनेश इन्नाणी, श्री. शरदकुमार नावंदर, श्री. ईश्वर डागा, श्री. लक्ष्मीकांत कर्वा, सूर्यप्रकाश धूत, डॉ अनिल राठी, श्री कमलकिशोर अग्रवाल, श्री बालकिशन बांगड, श्री संजय बियाणी, श्री आशिष अग्रवाल, सीए किशोर भराडिया, श्री चैतन्य भार्गव, श्री. आनंद लाहोटी, श्रीमती कुमुदिनी भार्गव तसेच सर्व शाळांचे मुख्याध्यापक, कर्मचारी वृंद, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

# हेल्मेटचा अभाव ठरला जीवघेणा

## अपघातात एका दुचाकीस्वाराचा मृत्यू, अज्ञात ट्रॅक्टर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**लातूर/प्रतिनिधी:** हेल्मेट असते तर कदाचित एक जीव वाचला असता... हा संदेश पुन्हा एकदा अधोरेखित करणारी दुर्दैवी घटना निलंगा तालुक्यात घडली आहे. रस्ते अपघातांमध्ये हेल्मेटचा वापर किती महत्त्वाचा आहे, याची जाणीव करून देणाऱ्या या प्रकरणात कासार शिरसी पोलीस ठाण्यात अज्ञात ट्रॅक्टर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात वाहतूक नियमांचे काटेकोर पालन व्हावे, अपघातांचे प्रमाण कमी व्हावे आणि नागरिकांमध्ये सुरक्षित वाहनचालना करण्याबाबत जनजागृती व्हावी यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. मात्र, नियमांकडे दुर्लक्ष केल्यामुळे अजूनही अनेक कुटुंबांना आपल्या प्रिय व्यक्तींना गमवावे लागत आहे.

फिर्यादी माधव अशोक सूर्यवंशी (रा. मिरगाळी, ता. निलंगा) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. १२ मे २०२६ रोजी रात्री सुमारे ८.०० वाजता त्यांचे भाऊ बसवराज अशोक सूर्यवंशी (वय ३५) हे मोटारसायकल (क्र. चक-१२-उछ-२४६४) वरून तांबाळा पाटी येथून मिरगाळीकडे जात असताना तांबाळा पाटी –ममदापूर रस्त्यावर भरधाव व निष्काळजीपणे येणाऱ्या अज्ञात ट्रॅक्टरने त्यांच्या मोटारसायकलला जोरदार धडक दिली.


या भीषण अपघातात बसवराज सूर्यवंशी गंभीर जखमी झाले. अपघात घडवून आणल्यानंतर संबंधित ट्रॅक्टर चालकाने जखमीला मदत न करता घटनास्थळावरून पलायन केले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

या अपघाताच्या तपासात आणखी एक अत्यंत महत्त्वाची बाब समोर आली असून, मृत दुचाकीस्वाराने हेल्मेट परिधान केले नव्हते. डोक्याला झालेला गंभीर आघात हा मृत्यूचे प्रमुख कारण ठरल्याचे प्राथमिक तपासातून समोर येत आहे. त्यामुळे प्रत्येक दुचाकीस्वाराने हेल्मेटचा वापर करणे ही केवळ कायदेशीर जबाबदारी नसून स्वतःच्या आणि कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी अत्यावश्यक बाब असल्याचे या घटनेतून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

या प्रकरणी कासार शिरसी पोलीस ठाणे गुन्हा क्रमांक १५६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (इछड) कलम २८१, १०६(१), १२५(अ), १२५(ब) तसेच मोटार वाहन कायदा कलम १३४ व १८४ अंतर्गत अज्ञात ट्रॅक्टर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार टी. बी. माने करीत आहेत.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, दुचाकी चालविताना चालकासह मागे बसणाऱ्या व्यक्तीनेही दर्जेदार हेल्मेट परिधान करावे. वेगमर्यादेचे पालन करावे, वाहतूक नियमांचे उल्लंघन टाळावे आणि अपघात झाल्यास जखमी व्यक्तीला तात्काळ वैद्यकीय मदत उपलब्ध करून द्यावी. एका क्षणाची निष्काळजीपणा आणि हेल्मेट न वापरण्याची चूक संपूर्ण कुटुंबाचे आयुष्य उद्ध्वस्त करू शकते, हा संदेश या घटनेतून प्रत्येक वाहनचालकाने घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

# दिवस कुठलाही असो, तो साजरा होणार झाड लावूनच – आमचे ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन



**लातूर/प्रतिनिधी:** जगात प्रत्येक दिवस कोणत्या ना कोणत्या कारणाने विशेष ठरतो. कधी डॉक्टरांचा सन्मान करण्याचा दिवस असतो, कधी चार्टर्ड अकाउंटंट्सचा, कधी शेतकऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस असतो, तर कधी एखाद्या महान व्यक्तिमत्त्वाची जयंती किंवा समाजसेवकाचा वाढदिवस. अनेकजण असे दिवस केक कापून, पुष्पगुच्छ देऊन किंवा शुभेच्छांचा वर्षाव करून साजरे करतात, मात्र आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशनने गेल्या २५८८ दिवसांपासून एक वेगळीच परंपरा जपली आहे प्रत्येक विशेष दिवस झाड लावून, ते जगवून आणि त्याचे संगोपन करूनच साजरा करायचा.

१ जुलै २०२६ हा दिवसही अनेक विशेष योगांनी समृद्ध होता. आज डॉक्टर्स डे, आज सीए डे, आज शेतकरी दिवस, आज हरितक्रांतीचे प्रणेते स्व. वसंतराव नाईक यांची जयंती, आमदार अभिमन्यूजी पवार, आमदार विक्रमजी काळे व आमदार संजयजी बनसोडे यांचे वाढदिवस तसेच स्टेट बँक ऑफ इंडिया यांचा वर्धापन दिन या सर्व निमित्तांचा उत्सव आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशनने पर्यावरणाला समर्पित केला.
या निमित्ताने गरुड चौक ते कृषी महाविद्यालय रस्ता दुभाजकात १०० मोठ्या लिंब वृक्षांची लागवड करत मागील तीन दिवसात एकूण ३५० झाडांचे रोपण करत वृक्षारोपणाचा उपक्रम यशस्वीपणे पूर्ण करण्यात आला. या उपक्रमात कृषी महाविद्यालय, लातूरचे सन्माननीय प्राचार्य प्रा. बाबासाहेब ठोंबरे, प्राध्यापक, विद्यार्थी तसेच नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (छखच–), लातूर शाखेचे अध्यक्ष डॉ. बालाजी सोळुंके, सचिव विनोद कदम आणि अनेक डॉक्टरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

आज हवामान बदल, वाढते तापमान आणि घटणारी हरिताई ही संपूर्ण मानवजातीसमोरील मोठी आव्हाने आहेत. अशा वेळी आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशनने सुरू केलेली ही हरित चळवळ केवळ पर्यावरण संवर्धनाची मोहीम नसून, ती पुढील पिढ्यांसाठी शुद्ध हवा, सावली, पाणी आणि जीवन जपण्याचा संकल्प आहे.

यावेळी डॉ. भास्कर बोरगावकर यांनी प्रत्येक नागरिकाने दरवर्षी किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे भावनिक आवाहन केले.
कार्यक्रमाच्या शेवटी झाड लावणे हा कार्यक्रम नसून संस्कार आहे, झाड जगवणे ही जबाबदारी आहे आणि हिरवीगार पृथ्वी हीच पुढील पिढ्यांसाठी आपण देऊ शकणारी सर्वात मोठी भेट आहे. असा संदेश देत डॉ. पवन लड्डा यांनी उपस्थित सर्व मान्यवर, डॉक्टर, प्राध्यापक, विद्यार्थी, स्वयंसेवक व सदस्यांचे आभार मानले.

## कै. वसंतराव ..

वसंतराव मुख्यमंत्री
विराजे वर्षे अकरा
सत्ता देवी वश सदा
स्वतःचं मारी चकरा
महाराष्ट्र धान्यसंपन्न
स्वप्न आले साकारा
सिंचन प्रकल्प भले
किती आणे आकारा
शिस्तबद्ध कार्य केले
विरोधीकरे जयकारा
रयतेच्या जवळचे ते
लांब ठेवले अहंकारा
शेतकरी अर्थ सक्षम
लाडका भलता नारा
जाणती दुखणे कुठे
कारभार असे न्यारा
अहोरात्र चिंता करी
भटकेविमुक्त उध्दारा
साक्ष दे कल्पकतेची
अजूनि वसंत बंधारा
सहयोगी सहजयोगी
बळ दिधले सहकारा
वाव नसेभावही नसे
मुळी भ्रष्ट कारभारा

**हेमंत मुसरीफ**
**पुणे**
९७३०३०६९९६

## मतदार यादी विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने लातूर येथे राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या बैठकीत मार्गदर्शन



**लातूर/प्रतिनिधी:** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येणाऱ्या मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण २०२६ कार्यक्रमाच्या अनुषंगाने २३५–लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील राजकीय पक्ष प्रतिनिधी आणि मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए) यांची बैठक नवीन जिल्हाधिकारी कार्यालयातील डी. पी. सी. हॉल येथे झाली. मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे–विरोळे यांच्या अध्यक्षतेखाली या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी लातूरच्या नायब तहसीलदार (निवडणूक) श्रीमती अर्चना मैंदर्गी उपस्थित होत्या.

बैठकीमध्ये विशेष संक्षिप्त पुनरीक्षण–२०२६ कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करणे, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याकडून राबविण्यात येणारी घरभेट मोहीम, आणि बीएलए–१ व बीएलए–२ यांची भूमिका व जबाबदाऱ्या याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. यासोबतच मतदार यादीची अचूकता, पारदर्शकता आणि सर्वसमावेशकता राखण्यासाठी आवश्यक असणाऱ्या विविध बाबींवर उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी बोलताना मतदार नोंदणी अधिकारी श्रीमती रोहिणी नऱ्हे–विरोळे यांनी सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी व मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींनी या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमात अत्यंत सक्रिय सहभाग नोंदवून प्रशासनास आवश्यक ते सर्व सहकार्य करावे, असे आवाहन केले. बैठकीच्या अंतिम टप्प्यात उपस्थित प्रतिनिधींनी मांडलेल्या विविध शंकांचे प्रशासनाकडून योग्य निरसन करण्यात आले. सर्व प्रतिनिधींनी विशेष संक्षिप्त पुनरीक्षण–२०२६ कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशासनाला पूर्ण सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

## लातूर मनपाच्या आयुक्तपदी राहुल कुलकर्णी

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर महापालिकेच्या आयुक्तपदी भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी राहुल कुलकर्णी (भाप्रसे) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सध्याच्या आयुक्त मानसी मीना या प्रसूती रजेवर जात असल्याने, त्यांच्या रिक्त होणाऱ्या जागेवर कुलकर्णी यांची तात्काळ नियुक्ती करण्याचे आदेश राज्य शासनाने मंगळवारी जारी केले. शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे सहसचिव सुभाष उमराणीकर यांच्या स्वाक्षरीने हे आदेश काढण्यात आले आहेत. राहुल कुलकर्णी हे सध्या मुंबई येथे ’महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाचे’ व्यवस्थापकीय संचालक असत. नूतन आयुक्त राहुल कुलकर्णी हे आपल्या सध्याच्या पदाचा कार्यभार प्रधान सचिव (सहकार व पणन) यांच्या सल्ल्याने अन्य अधिकाऱ्याकडे सोपवून, लातूर महानगरपालिका आयुक्तपदाचा सूत्रे हाती घेतील.


**www.latursamachar.com**
**वर रोज वाचा ऑनलाईन....**

### टी .सी. हरवली आहे

रुतविक ज्ञानेश्वर पवार या नावाची आर्दश सिनियर कॉलेज उमरगा ची बी.एस.सी पास ची टी. सी. निलंगा ते उमरगा बस प्रवासात हरवली आहे कोणास सापडल्यास संपर्क साधावा योग्य बक्षीस देण्यात येईल.

संपर्क
रुतविक ज्ञानेश्वर पवार
मोबाईल :९११९५२५२८३

### Name Of Change Declaration

Here in this Advertise I am Declaring that I have Change My Name Which Was Earlier: SHRADHA RAMESH UDDEWAD To: SHRADDHA RAMESH UDDEWAL. Hence for this Declaration i will be known by this name and will use SHRADDHA RAMESH UDDEWAL future the same name will used by my family husband/wife, children and relative.
**OLD NAME:** SHRADHA RAMESH UDDEWAD
**NEW NAME -** SHRADDHA RAMESH UDDEWAL
**Address -** NEAR PAWAN COLONY NATH NAGAR LATUR TQ DIST LATUR 413 512
**Aadhar No.** 340274847826
**Mob No.**+91 9881480985

### Name Of Change Declaration

Here in this Advertise I am Declaring that I have Change My Name Which Was Earlier: MRUNMAYI DINESH MORE To: GARGI HARSHADA BUVA. Hence for this Declaration i will be known by this name and will use GARGI HARSHADA BUVA future the same name will used by my family husband/wife, children and relative.
**OLD NAME -** MRUNMAYI DINESH MORE
**NEW NAME -** GARGI HARSHADA BUVA
Address - AT POST UJNI TQ AUSA DIST LATUR 413 512
**Aadhar No.** 9754 4082 3638
**Mob NO.** +91 9022034098

### Name Of Change Declaration

Here in this Advertise I am Declaring that I have Change My NameWhich Was Earlier: SHRIKANT WAMANRAO JOSHI To: SHRIKANT WAMANRAO DEVANGREKAR. Hence for this Declaration i will be known by this name and will use SHRIKANT WAMANRAO DEVANGREKAR future the same name will used by my family husband/wife, children and relative.
**OLD NAME -** SHRIKANT WAMANRAO JOSHI
**NEW NAME -** SHRIKANT WAMANRAO DEVANGREKAR
**Address -** AT POST NALEGAON TQ DIST LATUR 413 512
**Aadhar No.** 496366850702
**Mob NO.** +91 75075 65932



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade     Mo. 9422472502,     RNI 47034/64,     POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे.     मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे   मो. ९४२२४७२५०२     आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६